महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३

परिपत्रक क्र:मुंविमं/उ.मा.प. (इ.१२वी) /OMR Marksheet/ फेब्रु/मार्च-२०२५/०१६६ दि.१५/०१/२०२५

विषय :-उ. माध्य. प्र. परीक्षा फेब्रुवारी / मार्च -२०२५ परीक्षेच्या OMR Marksheet संदर्भातील सूचना.

संदर्भ :- १. क्र.रा.मं. / परीक्षा-६/४५०४, पुणे, दिनांक - २१/११/२०२४

२. क्र.रा.मं. / परीक्षा-२/४९९६, पुणे, दिनांक - २३/१२/२०२४

३. क्र.रा.मं. / परीक्षा-२/१२०, पुणे, दिनांक - ०९/०१/२०२५

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी / मार्च-२०२५ परीक्षेचे प्रात्यक्षिक व अंतर्गत मूल्यमापन तथा श्रेणी विषयाच्या श्रेणी OMR पध्दतीने न घेता ऑनलाईन पध्दतीने मागील वर्षाच्या परीक्षेप्रमाणे करावयाच्या आहेत. त्या अनुषंगाने सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना ऑनलाईन पध्दतीने गुण भरून मंडळाकडे कशाप्रकारे पाठवावयाचे आहेत याबाबतच्या सर्वसाधारण सूचनांचे क्र.रा.मं. / परीक्षा -२/१२०, पुणे, दिनांक - ०९/०१/२०२५ चे पत्र या परिपत्रकासोबत देण्यात येत आहे. त्यानुसार सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी उचित कार्यवाही करावी.

इ. १२ वी च्या फेब्रुवारी / मार्च-२०२५ परीक्षेचे खाली नमूद केल्याप्रमाणे साहित्य शुक्रवार दिनांक **१७/०१/२०२५ रोजी वितरण केंद्रावर देण्यात येत आहे.**

१. इ. १२ वी च्या फेब्रुवारी / मार्च-२०२५ परीक्षेचे वेळापत्रक
२. प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा उत्तरपत्रिका
३. फॉर्म नं. ३ अ

खालील नमूद केलेले प्रपत्र संकेतस्थळावर उपलब्ध आहेत त्यावरून प्रिन्ट घ्यावी.

१. Maker Login मध्ये विषय निहाय/ माध्यम निहाय त्या त्या विषयाच्या विद्यार्थ्यांची कोरी पृष्ठे (Blank Marksheet) प्रात्यक्षिक / पर्यावरण / तोंडी / प्रकल्प / श्रेणी विषयाचे परीक्षेदरम्यान गुणांकन करण्यासाठी उपलब्ध होतील.
2. हमीपत्र (तक्त्यात नमूद गुण / श्रेणी व गैरहजेरी इ. तपासल्याबाबत)
३. गैरहजेरी तक्ता ४. Extra Entry चे तक्ते

प्रात्यक्षिक / तोंडी / प्रकल्प / श्रेणी विषयाचे गुणतक्ते व श्रेणीतक्ते तसेच इतर महत्वाची कागदपत्रे मंडळाकडे जमा करावयाच्या तारखा खालीलप्रमाणे:-

जिल्हयाचे नांव व क्रमांक	गुणतक्ते/ श्रेणीतक्ते व इतर साहित्य जमा करण्याचा दिनांक	निर्धारित तारखेनंतर दंडात्मक शुल्क आकारण्याच्या तारखा
जिल्हा -१७ रायगड (१७.०१ ते १७.१५)	गुरूवार दिनांक - १३/०२/२०२५	दिनांक - १४/०२/२०२५
जिल्हा -१८ पालघर (१८.०१ ते १८.०८)	शुक्रवार दिनांक - १४/०२/२०२५	दिनांक - १५/०२/२०२५
जिल्हा -१६ ठाणे (१६.०१ ते १६.०५ व १६.१४)	शनिवार दिनांक - १५/०२/२०२५	दिनांक - १६/०२/२०२५
जिल्हा -१६ ठाणे (१६.१५ ते १६.१९)	सोमवार दिनांक - १७/०२/२०२५	दिनांक - १८/०२/२०२५
जिल्हा -३१ मुंबई (३१.०१ ते ३१.०५)	मंगळवार दिनांक - १८/०२/२०२५	दिनांक - १९/०२/२०२५
जिल्हा -३२ बृहन्मुंबई पश्चिम उपनगर (३२.०१ ते ३२.०६)	गुरुवार दिनांक - २०/०२/२०२५	दिनांक - २१/०२/२०२५
जिल्हा -३३ मुंबई मध्य उपनगर (३३.०१ ते ३३.०६)	शुक्रवार दिनांक - २१/०२/२०२५	दिनांक - २२/०२/२०२५

Scanned with OKEN Scanner

प्रात्यक्षिक / तोंडी/ प्रकल्प/ श्रेणी विषयाचे गुणतक्ते व श्रेणीतक्ते तसेच इतर महत्वाची कागदपत्रे मंडळाकडे जमा करताना दक्षता घेण्याबाबतच्या महत्वाच्या सूचना.

१. आपल्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Rough Draft न देता Final Print घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाच्या बाबत) व तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इत्यादी गुणतक्त्यानुसार संबंधित विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून सदर गुणतक्त्यावर प्राचार्य / मुख्याध्यापक यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे. गुणतक्ते व श्रेणीतक्ते विषय निहाय क्रमाने लावून देण्यात यावे.

२. सदरचे गुणतक्ते विभागीय मंडळाकडे उपरोक्त नमूद निर्धारित तारखेस प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकीटामध्ये, पाकिटावर कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, Index No घालून जमा करावयाचे आहेत. तसेच गुणतक्त्याची एक प्रत कनिष्ठ महाविद्यालयात माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

३. **अतिविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये आवेदनपत्र भरलेल्या म्हणजेच (Additional Seat No असलेल्या) व या गुणांच्या Online System मध्ये ज्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक उपलब्ध झालेले नाहीत, अथवा विषय बदल केला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांचे गुण प्रचलित पध्दतीने Extra Entry च्या तक्त्यातच नमूद करण्यात यावेत व यापैकी जे विद्यार्थी गैरहजर असतील (AA) अशाप्रकारे त्याचीही नोंद या तक्त्यातच करण्यात यावी. तक्त्यावर कॉलेज क्रमांक, केंद्र क्रमांक व विषय स्पष्ट नमूद करण्यात यावा. व हे Extra Entry चे तक्ते स्वतंत्र विषयनिहाय वरील दिनांकास मंडळाकडे जमा करावेत. Extra Entry चे तक्ते जमा केल्याशिवाय OMR चे गुणतक्ते स्विकारले जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी. (Extra Entry गुण तक्त्याचा नमूना संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेला आहे.)**

४. श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना पर्यावरण विषय (EVS/31) व आरोग्य व शारिरीक शिक्षण (PT/30) या विषयांमध्ये आधीच्या परीक्षेतील श्रेणी या योजनेखाली होणाऱ्या परीक्षेसाठी ग्राहय (Carry Forward) धरून तीच श्रेणी नोंदविण्यात यावी. कोणत्याही विद्यार्थ्यांस EVS व PT या विषयांत गैरहजर दाखवू नये. गैरहजर दाखविल्यास विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

५. प्रात्यक्षिक / तोंडी / प्रकल्प / विषयाचे गुणतक्ते, पर्यावरण व आरोग्य व शारिरीक शिक्षण विषयाचे श्रेणीतक्ते तपासून ते बरोबर असल्याबाबतचे हमीपत्र प्राचार्यांनी (विषय शिक्षकांच्या सहीसह) गुणतक्ते विभागीय मंडळास सादर करतांना देण्यात यावे. हमीपत्र प्रमाणित न करता सादर केलेले गुणतक्ते स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

६. सर्व साहित्य सीलबंद पाकिटात कनिष्ठ महाविद्यालयांनी वर नमुद तारखांना मंडळ कार्यालयामध्ये हस्तपोच जमा करावेत.

७. **प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका मंडळ कार्यालयात जमा करण्यात याव्यात.** मात्र तोंडी परीक्षेच्या व पर्यावरण व आरोग्य व शारिरीक शिक्षण विषयांच्या उत्तरपत्रिका आणि तोंडी / प्रकल्प/ श्रेणी परीक्षेला विद्यार्थ्यांचे स्वाक्षरी घेतलेले Form No. (३A) हे **मंडळात जमा करू नये** ते विषयनिहाय बांधून एक वर्षापर्यंत कनिष्ठ महाविद्यालयांनी जतन करून ठेवाव्यात.

प्रात्यक्षिक / पर्यांवरण / प्रकल्प गुणपत्रिका / भाषा विषय तोंडी परीक्षा गुणपत्रिका / श्रेणी इ. परीक्षेचे साहित्य सादर न करणे याबाबतच्या रा.म./परीक्षा-३/४७०५/दि:-०९/०८/२०१६ च्या पत्रानुसार नियोजित मागील पृष्ठावर नमूद केलेल्या तारखेनंतर साहित्य मंडळात सादर केल्यास खालीलप्रमाणे दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अ) निर्धारित तारखेनंतर पुढील ५ दिवसापर्यंत रु. ५०/- प्रती दिन प्रती विषय

ब) ०६ ते १० दिवसापर्यंत रु. १००/- प्रती दिन प्रती विषय

क) ११ वा दिवस ते Out Of Turn प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षेच्या तारखेपर्यंत रु.२००/- प्रती दिन प्रती विषय

..२..

Scanned with OKEN Scanner

Out Of Turn परीक्षा घेण्याबाबत महत्त्वाच्या सूचना

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील जे विद्यार्थी मंडळाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार प्रात्यक्षिक, श्रेणी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची **Out Of Turn परीक्षा घेण्याची तरतूद असल्याने** सदर विद्यार्थ्यांचे परीक्षेस प्रविष्ठ न होण्याचे कारण नमूद केलेला अर्ज, वैद्यकीय प्रमाणपत्र/तत्सम कारण, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे अभिप्राय, प्रवेशपत्राची छायांकित प्रत, प्रती विषय रू. १००/- प्रमाणे निर्धारित परीक्षा शुल्कासह मंडळ कार्यालयात दि. ११.०३.२०२५ पर्यंत सादर करावी. दिनांक १२.०३.२०२५ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर शुल्क भरलेल्याच विद्यार्थ्यांची **Out Of Turn परीक्षा** राज्यमंडळाच्या पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/४९९६, पुणे, दि. २३.१२.२०२४ नुसार दि.१२.०३.२०२५, १५.०३.२०२५ व दि. १७.०३.२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात यावी.

नियमित कालावधीमध्ये जे विद्यार्थी गैरहजर राहिलेले आहेत, अशाच विद्यार्थ्याचे बैठक क्रमांक सदर OUT OF TURN परीक्षेसाठी ज्या त्या कनिष्ठ महाविद्यालयास उपलब्ध करून दिले जातील. गैरहजर विद्यार्थ्यांपैकी आपणाकडून मंडळात सादर केलेल्या प्रस्तावाच्या विद्यार्थ्यांचेच गुण OUT OF TURN मध्ये नोंदविण्यात यावेत. सदर विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन पध्दतीने " OUT OF TURN MARKS " या OPTION द्वारे नोंदवून कनिष्ठ महाविद्यालयांनी सदर परिपत्रकातील अ.क्र. १,२ व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

उपरोक्त कालावधीतील घेतलेल्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षेचे म्हणजेच Out Of Turn परीक्षेचे Extra Entry चे तक्ते मंडळ कार्यालयात खालील तारखांना जमा करावेत.

जिल्हयाचे नांव व क्रमांक	गुणतक्ते/ श्रेणीतक्ते व इतर साहित्य जमा करण्याचा दिनांक
जिल्हा - ३१/ ३२/ ३३ (मुंबई , बृहन्मुंबई पश्चिम उपनगर,मुंबई मध्य उपनगर) जिल्हा -१६ / १७ / १८ (ठाणे, रायगड , पालघर)	मंगळवार दिनांक -- १८/०३/२०२५

टिप :- १. नियमित विद्यार्थ्यांचे गुण/ श्रेणी तक्त्याची Final Printout स्वतंत्र सिलबंद पाकिटात जमा करावी.

२. अतिविलंब विद्यार्थ्यांचे म्हणजेच अतिरिक्त बैठक क्रमांकाने प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे व बदललेल्या विषयाचे Extra Entry तक्ते वेगळया स्वतंत्र सिलबंद पाकिटात जमा करण्यात यावेत.

३. याचप्रकारे OUT OF TURN ने प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची पाकिटे उपरोक्त दिनांकास जमा करण्यात यावीत.

*** सदर परिपत्रक आपल्या दप्तरी जतन करुन ठेवण्यात यावे. मंडळाची सर्व परिपत्रके व इतर राज्यमंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील Home Page वरुन मुंबई विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून माहिती व कार्यवाहीसाठी संकेतस्थळाचा नियमित वापर करण्यात यावा, तसेच शासन व मंडळ संकेतस्थळ (Website) दररोज पहावे.**

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
प्र.विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३.

प्रति,

प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कक्षेतील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये.

प्रत माहितीस्तव :-

१. मा. सचिव, राज्यमंडळ, पुणे.
२. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग.
३. शिक्षण निरिक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम) विभाग.
४. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. ठाणे/पालघर/रायगड जिल्हे

Scanned with OKEN Scanner

COLLEGE INDEX NO. ----------

HSC EXAM FEB/ MAR- 2025

ENTER ONLY ORAL/GRADE/EVS ABSENT SEAT NOS.PROJECT SUBJECT

Following are the subject wise absent seat nos.

1. Subject Name & Code Nos. (Seat No.) _____

---

2. Subject Name & Code Nos. (Seat No) _____

---

3. Subject Name & Code Nos. (Seat No.) _____

SIGNATURE OF PRINCIPAL
COLLEGE STAMP

Scanned with OKEN Scanner

COLLEGE INDEX NO. ----------

HSC EXAM FEB/MAR- 2025

ENTER ONLY ORAL/GRADE/EVS ABSENT SEAT NOS.PROJECT SUBJECT

Following are the subject wise absent seat nos.

4. Subject Name & Code Nos. (Seat No.) _____

_____

_____

_____

_____

---

5. Subject Name & Code Nos. (Seat No) _____

_____

_____

_____

---

6. Subject Name & Code Nos. (Seat No.) _____

_____

_____

_____

SIGNATURE OF PRINCIPAL
COLLEGE STAMP

Scanned with OKEN Scanner

हमीपत्र

महाविद्यालय सांकेतिक क्रमांक: जे ----------

मी प्राचार्य, श्री / श्रीमती ----------फेब्रु/ मार्च-2025

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या तोंडी परीक्षेचे गुणतक्ते, पर्यावरण आणि आरोग्य व शारिरीक शिक्षण विषयाचे श्रेणीतक्ते या हमीपत्रासोबत सादर करीत असून सदर तोंडी गुणतक्त्यांत नमूद गुण व पर्यावरण आणि आरोग्य व शारिरीक शिक्षण विषयाच्या श्रेणी मी स्वत: तपासल्या असून गुणतक्ते व श्रेणीतक्ते बिनचुक असल्याबददल हमी देत आहे.

तसेच सदर गुणतक्त्यात, श्रेणीतक्त्यात कोणतीही दुरूस्ती निकालानंतर मंडळास कळविण्यात येणार नाही याची हमी देतो. जर निकालानंतर दुरूस्ती निघाल्यास प्राचार्य या नात्याने विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस मी संपुर्णपणे जबाबदार राहीन.

तोंडी / पर्यावरण / आरोग्य व शारिरीक शिक्षण विषयास गैरहजर विद्यार्थ्यांचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

अ.क्र.	बैठक क्रमांक	तोंडी परीक्षा विषय			पर्यावरण विषय	आरोग्य व शारिरीक शिक्षण
खाली दिलेल्या नमून्याप्रमाणे उपरोक्त तक्त्यात विषयनिहाय गैरहजेरी दर्शवावी						
१	M000001	इंग्रजी-AA	हिंदी-AA	मराठी-AA	पर्यावरण-AA	आ.व शा.शि. AA

प्राचार्य,

दिनांक : / / 2025

कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व शिक्का

Scanned with OKEN Scanner

HSC (12th) MARCH-202

COLLEGE INDEX NO. J-.....

EXTRA ENTRY MARKSHEET

OUT OF TURNS & ADDITIONAL CANDIDATES SEAT NOS. MARKS

Subject---------- **Subject Code---------**

Sr. No.	SEAT No	MARKS	MARKS(IN WORDS)	REMARKS
1				
2				
3				
4				
5				
6				
7				
8				
9				
10				
11				
12				
13				
14				
15				

Internal Examiner
Name & Sign

External Examiner
Name & sign

Principal Sign. With
College Stamp

Scanned with OKEN Scanner